४ समस्या निवारण (Problem Solving)

५ ठाम नकार (How to say no)

६ परिणामकारक सुसंवाद (Effective Communication)

७ परस्पर संवाद कौशल्य (Interpersonal Communication)

८ भावनिक समतोल कौशल्य (Coping with Emotions)

९ स्वत:ची ओळख (Self Awareness)

१० सहानुभुती (Empathy)

**◄ उद्दीष्टे साध्य करण्यासाठी वापरली जाणारी कार्यपद्धती**

१. दृकश्राव्य घटकांचा वापर (Audio-Visual Aid)

२. गटचर्चा (Group Discussion)

३. अभिमुखता (Orientation)

४. परस्पर सहभाग (Interactive / Participatory)

५. प्रदर्शने (Exhibitions)

६. पालक समुपदेशन (Parental Counseling)

७. तज्ञ व्याख्याने (Guest Lectures)

८. वैयक्तिक आणि गट समूपदेशन इत्यादी.
(Individual and Group Counseling)







## संपर्क

### 'हितगुज'

(शालेय समुपदेशन कार्यक्रम)


**दिलासा सल्ला व मार्गदर्शन केंद्र**
१४९५, सी, कोंडाओळ, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर
फोन: ०२३१ - २६४०६९६
**Email ID :** schoolcounselingsms@gmail.com


*"Children are like buds in a garden and should be carefully and lovingly nurtured, as they are the future of the nation and the citizens of tomorrow".*
- Jawaharlal Nehru.

# ''हितगुज''

(शालेय किशोरवयीन मुलामुलींसाठी समुपदेशन कार्यक्रम)

## सांगली मिशन सोसायटी

(Reg. No. Mah./3863/Sangli & F / 3827, Sangli)





# ''हितगुज''

**सांगली मिशन सोसायटी** हि एक नोंदणीकृत सामाजिक संस्था असून याची सुरवात १९९० मध्ये सांगली जिल्ह्यात झाली. संस्थेची नोंदणी मुंबई पब्लिक ट्रस्ट अधिनियम, १९५० अंतर्गत झाली असून नोंदणी क्रमांक ३०७१९९३ (एफ/३८२७/सांगली) व २००३१९९३ (एम/३८६३/सांगली) असा आहे तसेच १२ A व ८० G ही प्रमाणपत्रे आहेत. संस्था कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या चार जिल्ह्यामध्ये समाजातील विविध घटकासाठी गेली २५ वर्षे कार्य करत आहे. सध्या संस्थेकडे औपचारीक शिक्षण, अपंग मुलांचे शिक्षण व पुनर्वसन, विशेष मुलांचे शिक्षण व पुनर्वसन, आर्थिक दुर्बल घटक, एच. आय. व्ही./एडस् सह जिवन जगणाऱ्या लोकांसाठी काळजी व आधार केंद्रे, सामाजिक विकास, आरोग्य, शाश्वत शेती प्रोत्साहान, पर्यावरण विकास, समुदाय आधारित पुनर्वसन, महिला सक्षमिकरण इ.साठी विविध प्रकल्प आहेत.



## हितगुज

१० ते १९ वर्षादरम्यानच्या संक्रमणाच्या काळाला किशोरावस्था असे म्हणतात. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील हा शारिरीक मानसिक व सामाजिक जडणघडणीचा काळ असतो. शैक्षणिक जीवन हा किशोरावस्थेचा पाया असून जीवनाची योग्य दिशा ह्याच काळात ठरत असते. बदलती जीवनशैली आणि प्रसारमाध्यमांचा प्रभाव यांच्यामुळे प्रभावीत होत असलेल्या किशोरवयीन मुलामुलींना योग्य मार्गदर्शन व त्यांच्या शारिरीक, मानसिक व सामाजिक स्तरावरील समस्या सोडवण्यासाठी हितगुज (शालेय समुपदेशन) हा कार्यक्रम राबवण्याचा सांगली मिशन सोसायटी तर्फे केलेला प्रयत्न आहे.

## प्रकल्पाचे उद्दिष्ट

१. विद्यार्थ्यामध्ये शारिरीक व मानसिक बदल, नाते संबंधातील अडचणी व प्रसार–माध्यमांच्या वापराबाबत जागरूकता निर्माण करणे.

२. जीवन कौशल्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे चांगले व्यक्तीमत्व घडवण्यास मदत करणे व त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे.



३. सकारात्मक मानसिक आरोग्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम बनवणे.

## लक्ष्य गट

- ७, ८ व ९ या इयत्तेतील शिकणारे किशोरवयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी

**'हितगुज' शालेय समुपदेशन कार्यक्रम अभ्यासक्रमात जागतिक आरोग्य संघटनेच्या (W.H.O.) निर्देशानुसार खालील मुद्यांचा अंर्तभाव करण्यात आला आहे.**

१. शारीरिक – मानसिक व सामाजिक आरोग्याविषयी जागरुकता निर्माण करणे

२. बदलती जीवनशैली आणि नाते संबंधातील ताण–तणाव

३. आधुनिक प्रसारमाध्यमे आणि विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम

४. व्यक्तिमत्व विकास

५. शालेय अभ्यास सवयी व करियर मार्गदर्शन

**जीवन कौशल्य शिक्षण**

१ तर्कशुध्द विचार (Critical Thinking)

२ सृजनशील विचार (Creative Thinking)

३ निर्णय क्षमता (Decision Making)

